भिवंडी वाहतूक उपविभाग हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/९४७/२०२६ दि. ०७/०८/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, भिवडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि.०७/०८/२०२६ रोजी रात्री २२:०० वा. ते दि.०९/०८/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा. पर्यत भिवंडी निजामपुरा महानगरपालिका तर्फे बागे फिदोस येथील अलाईड पेट्रोलपंप ते बागदरी हॉटेल **वंजारपट्टीनाका येथ पर्यंतच्या रस्त्याचे दुरुस्तीचे** काम करण्यात येणार आहे. यावेळी बागे फिरदोस कडुन ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्रीजच्या खालुन वंजारपटट्री नाक्याकडे जाणारी वाहतुक पुर्णत: बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद – १) नारपोली, माणकोली, रांजनोली कडुन कल्याण नाका, भिवंडी एस.टी. स्टॅड, बागे फिरदोस मार्गे तसेच स्व. राजीव गांधी ब्रीज मार्गे ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्रीजच्या खालुन बारादरी हॉटेल मार्गे वंजारपट्टी नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **(दुचाकी, चारचाकी तसेच जड अवजड वाहने) बागे फिरदोस** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची सर्व प्रकारची वाहने बागे फिरदोस येथुन ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्रीजच्या खालुन न जाता ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्रीजच्या वरुन इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) रियल स्वीट समोरील कट मधुन येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्रीज खालील रियल स्वीट समोरील कट 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने ही ए.पी.जे. अब्दुल कलाम ब्रीज खाली न जाता बागे फिरदोस, एसटी स्टॅण्ड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना **दिनांक ०७/०८/२०२६ रोजी रात्री २२:०० वा. ते दिनांक ०९/०८/२०२६ रोजी सकाळी ०६:०० वा.** पर्यंत पर्यंत अंमलात राहील.

सदर अधिसूचना पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील व सदर कामातील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.

परिवहन व्यवस्थापक, भिवंडी

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी

नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ वाहतूक विभाग व पोलीस निरीक्षक, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.

(ब्रीज खालील रस्ता)
वडा कडे
(ब्रीज खालील रस्ता)
APJ अब्दुल कलाम ब्रीज (बंजारपट्टी)
चांदा-नागपूर कडे
छ.शिवाजी महाराज चौक कडे
बाराडरी हॉटेल
पेट्रोलपंप
इकडची ट्रॅफिक वळली.
पेट्रोलपंप
सिराज हॉस्पीटल
आमपाडा कडे
जलदिप पेट्रोलपंप
पेट्रोलपंप
बाळो फिरदोस
कलेक्शन नाका
ST स्टँड
स्व.राजीव गांधी ब्रीज
इकडची ट्रॅफिक वळली.
इकडची ट्रॅफिक वळली.
इकडून कारा कालमाग कडे